**ठळक बातम्या**

- राज्यात परकीय गुंतवणुकीतून उभ्या राहात असलेल्या उद्योगांची संख्या वाढत असून, ७५ टक्के करार हे प्रत्यक्षात उतरत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी उद्या मतमोजणी

- मलेशिया दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मायदेशी परतले

- आगामी ५ वर्षांमधे अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तू विकत घेण्यात कोणतीही अडचण येणार नसल्याचं मंत्री पीयुष गोयल यांच्याकडून स्पष्ट

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत चुरशीच्या सामन्यात इंग्लंडची नेपाळवर मात

**<><><><><>**

राज्यात परकीय गुंतवणुकीतून उभ्या राहात असलेल्या उद्योगांची संख्या वाढत असून, ७५ टक्के करार हे प्रत्यक्षात उतरत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज अहिल्यानगरमध्ये एका ॲल्युमिनियम कास्टिंग कंपनीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. गेल्या वर्षी दावोस येथे झालेल्या गुंतवणूक करारांमधून उत्तर महाराष्ट्रातल्या ५ जिल्ह्यांमध्ये रोजगाराच्या ७५ हजार संधी उपलब्ध झाल्या असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. या करारांच्या माध्यमातून होणार असलेल्या ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकी पैकी एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

उद्योग मंत्री उदय सामंत, अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कंपनीचे कार्यकारी संचालक भरत गीते यांच्यासह मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नाशिक जिल्ह्यामधल्या मालसाणे इथल्या णमोकार तीर्थ इथं आंतरराष्ट्रीय पंचकल्याण प्रतिष्ठा आणि महामस्तकाभिषेक सोहळ्यातही उपस्थित

होते. तीर्थकारांनी दिलेला अहिंसा, शांती आणि करुणेचा संदेश संपूर्ण मानवतेसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे, ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत ताज पॅलेस हॉटेल इथं सेशेल्सचे अध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांची भेट घेतली आणि विविध विषयांवर चर्चा केली. किनारपट्टी व्यवस्थापन, बंदरांवर केंद्रित विकास तसंच, महाराष्ट्र आणि सेशेल्समध्ये सहकार्य वाढीच्या संधी यांवर या भेटीदरम्यान चर्चा झाल्याचं फडणवीस यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. या दरम्यान, फडणवीस यांनी हर्मिनी आणि सेशेल्सच्या नागरिकांना त्यांच्या ५०व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छाही दिल्या. या बैठकीला सेशेल्सचे परराष्ट्र मंत्री बॅरी फोर, अर्थमंत्री पिअरे लापोर्टे यांच्यासह मंत्री तसंच राज्यातले वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या मतमोजणी होणार आहे. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरूवात होईल. मतमोजणीसाठी राज्य निवडणूक आयोगानं सुरक्षेसह सर्व व्यवस्था केली आहे. काल या निवडणुकीसाठी सर्वत्र शांततेत मतदान झालं. एकूण सरासरी ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के मतदान झाल्याचं राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

**<><><><>**

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आज छत्रपती संभाजीनगर इथं आयुष मंत्रालय आणि केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या वेलनेस सेंटरचं उद्घाटन झालं. हे केंद्र सर्वांगीण आरोग्य सेवेच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं जाधव यावेळी म्हणाले. केंद्र सरकार आजारांवरच्या उपचारांबरोबरच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्राधान्य देत असून, “उपचारापेक्षा प्रतिबंध” या तत्त्वावर काम करत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

अमरावती महानगरपालिका महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपाच्या उमेदवाराला पाठिंबा दिल्याबद्दल एमआयएमनं त्यांच्या नगरसेविका मिरा कांबळे यांना पक्षातून निलंबित केलं आहे. एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये ही माहिती

दिली. एमआयएमनं अमरावती महानगरपालिका निवडणुकीत १२ जागा जिंकल्या आहेत. महापौर निवडणुकीच्या वेळी तटस्थ राहण्याचा पक्षादेश डावलून मिरा कांबळे यांनी भाजपाच्या उमेदवाराला पाठिंबा दिल्याबद्दल ही कारवाई करण्यात आल्याचं जलील म्हणाले.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण तालुक्यात पाचोड इथल्या मतदान केंद्रावर शिवसेना आमदार विलास भुमरे यांनी आपल्या अल्पवयीन मुलाला मतदान कक्षात नेल्याचा प्रकार उघडकीला आला आहे. यासंदर्भात व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये भुमरे आणि त्यांच्या मुलाच्या बोटाला शाई लावल्याचंही दिसत आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश देऊन, घटनेचा अहवाल मागितला आहे. सोलापूर जिल्ह्याच्या अकलूजमधल्या यशवंत नगर इथंही असाच प्रकार घडला. तिथं उमेदवार अर्जुनसिंह मोहिते पाटील यांनी आपल्या १४ वर्षांच्या मुलाला मतदान केंद्रात सोबत नेलं होतं. यासंदर्भातल्या व्हायरल व्हिडिओत हा मुलगा मतदान यंत्राचं बटण दाबताना दिसत आहे.

<><><><><>

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसगाड्या दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या ५५ आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या गाड्यांना राजमाता जिजाऊ यांचं नावं देण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसगाड्या महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत, असं ते म्हणाले.

<><><><><>

दोन दिवसांचा मलेशिया दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले. दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी उभय देशांमधे संरक्षण, सेमीकंडक्टर्स, आणि व्यापार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार्याबाबत चर्चा झाली. मलेशियाबरोबर भारताचं विशेष नातं असल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याबरोबर संयुक्त

निवेदनात व्यक्त केली. दहशतवादाविरोधात मित्र देशांना पूर्ण सहकार्य देण्याचं भारताचं धोरण असून त्याबाबत दुटप्पीपणा किंवा कोणतीही तडजोड होणार नाही असं मोदी यांनी स्पष्ट केलं.....

**- - - होल्ड- बाईट- मोदी - - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय तंत्रज्ञान, आरोग्य, आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रात परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याचा निर्धार दोन्ही पक्षांनी व्यक्त केला. आशिया प्रशांत महासागर क्षेत्रात शांतता आणि विकास या उद्दिष्टांसाठी ही मैत्री आवश्यक असल्याचं मोदी म्हणाले. या द्विपक्षीय चर्चेनंतर विविध क्षेत्रातल्या ११ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><><>**

आगामी ५ वर्षांमधे अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तू विकत घेण्यात कोणतीही अडचण येणार नाही असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. भारत- अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर ते पीटीआय या वृत्तसंस्थेला मुलाखत देत होते. हवाई वाहतूक क्षेत्रासाठी १०० अब्ज डॉलर्स किमतीचा माल आवश्यक असून इंधन तेल, कच्चं तेल, एलपीजी आणि एलएनजी वायू देखील खरेदी केला जाईल. या व्यापार करारामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतीय मालावरचं आयातशुल्क अमेरिकेत सर्वात कमी झालं आहे असं त्यांनी सांगितलं.

अमेरिकेतून येणाऱ्या दुग्धोत्पादनांवर, तसंच जी एम उत्पादनांवर भारताने आयातशुल्कात कोणतीही सूट दिलेली नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतात अवैध वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी नागरिकांना आज मुंबईतल्या कुरार गावातून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून बांगलादेशी नागरिकत्वाचे पुरावे जप्त करण्यात आले असून त्यांना मायदेशी परत पाठवण्याची कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

म्हाडातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातल्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांसाठीच्या ४ हजार १८६ घरांच्या विक्रीसाठी येत्या १० तारखेला सोडत काढण्यात येणार आहे. या सदनिकांसाठी २

लाख ५८ हजार ८३२ अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यातील २ लाख १५ हजार ९६५ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केलेला असून त्यांचा सोडतीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**<><><><><>**

सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी एक प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने आणि भारतीय राष्ट्रीय कला आणि सांस्कृतिक वारसा विश्वस्त मंडळाबरोबर एक सामंजस्य करार केला आहे. मराठवाड्याच्या भागात हजारो ऐतिहासिक कलाकृती, चित्र आणि प्राचीन हस्तलिखितं उपलब्ध आहेत, मात्र अशा दस्तऐवजांचं वैज्ञानिक पद्धतीनं जतन संरक्षण करण्यासाठी सुविधांच्या अभाव आहे.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या सामन्यात चुरशीच्या लढतीत इंग्लंडने नेपाळवर चार धावांनी मात केली. ग्रुप सी मधील इंग्लंड आणि नेपाळ यांच्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात आलेला सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगला. इंग्लडनं नेपाळचा ४ धावांनी पराभव केला असला तरी नेपाळच्या संघानंही चांगलाच लढा दिला. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत नेपाळ समोर विजयासाठी १८५ धावाचं आव्हान ठेवलं. त्याचा पाठलाग करतांना नेपाळला १८० धावांवर रोखण्यात इंग्लंडला यश आलं.

**//<><><><><>//**